क्र.पोमसं/१अ-१/२२-४/मालमत्ता खरेदी-विक्री परवानगी/६५/२०१६ मुंबई, दि. ०१/०२/२०१७.

**विषय :-** स्थावर मालमत्ता खरेदी / विक्रीकरिता परवानगीबाबत.

***** ***** *****

**परिपत्रक :-**

१. शासन पत्र, गृह विभाग, क्र.रापोसे ३०१६/ प्र.क्र.२७३/पोल १अ, दि.०२/११/२०१६ ची प्रत, माहिती व पुढील आवश्यक त्या कार्यवाहीसाठी सोबत जोडली आहे.

२. उपरोक्त विषयाबाबत राज्य पोलीस सेवेतील अधिका-यांचे पोलीस महासंचालक कार्यालयाकडे प्राप्त झालेले अर्ज / प्रस्ताव शासनाकडे मंजुरीसाठी पाठविले जातात. सदर प्रस्तावांच्या अनुषंगाने, मालमत्ता खरेदी / विक्रीकरिता शासनाच्या परवानगीची आवश्यकता असलेले प्रस्ताव, महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, १९७९, मधील नियम १९ (२), व (३) नुसार तपासूनच मान्यतेसाठी सादर करणे आवश्यक आहे.

सदर नियम खाली नमुद प्रमाणे:-

(२) कोणताही शासकीय कर्मचारी, विहित प्राधिकरणाला अगोदर कळविल्याखेरीज, कोणतीही स्थावर मालमत्ता, एकतर त्याच्या स्वत:च्या नावाने किंवा त्याच्या कोणत्याही कुटुंबियांच्या नावाने, भाडेपट्ट्याद्वारे, गहाणाद्वारे, खरेदीद्वारे, विक्रीद्वारे भेट म्हणून किंवा अन्यथा संपादित करणार नाही किंवा तिची विल्हेवाट लावणार नाही :

परंतु, जर असा कोणताही व्यवहार -

(एक) शासकीय कर्मचा-याशी कार्यालयीन व्यवहार करणा-या व्यक्तीबरोबर, किंवा

(दोन) नेहमीच्या किंवा प्रसिध्द व्यापा-याच्या मार्फत असेल त्याहून अन्य प्रकारे, केला असेल तर शासकीय कर्मचा-याला विहित प्राधिकरणाची पूर्वमंजुरी मिळवावी लागेल.

(३) प्रत्येक शासकीय कर्मचारी त्याने स्वत:च्या नावाने किंवा त्याच्या कोणत्याही कुटुंबियांच्या नावाने केलेला प्रत्येक व्यवहार कोणतेही गट 'अ' चे किंवा गट 'ब' चे पद धारण करणा-या शासकीय कर्मचा-याच्या बाबतीत *रु. (२०,०००/-) हून जास्त आणि गट 'क' चे किंवा गट 'ड' पद धारण करणा-या कर्मचा-याच्या बाबतीत *रु. (१५,०००/-) हून जास्त किंमतीची मालमत्ता असेल तर, विहित प्राधिकरणाला कळवील.

परंतु, जर असा कोणताही व्यवहार -

(एक) शासकीय कर्मचा-याशी कार्यालयीन व्यवहार करणा-या व्यक्तीबरोबर, किंवा

(दोन) नेहमीच्या किंवा प्रसिध्द व्यापा-याच्या मार्फत असेल त्याहून अन्य प्रकारे, केला असेल तर शासकीय कर्मचा-याला विहित प्राधिकरणाची पूर्वमंजुरी मिळवावी लागेल.

# (३ अ) उप नियम २ अथवा ३ मध्ये काहीही नमुद केले असले तरी कर्मचा-याच्या पत्नीने / पतीने किंवा कुटुंबियांपैकी अन्य सदस्यांनी, त्यांच्या किंवा तिच्या स्वत:च्या मिळकतीद्वारे स्वत:च्या नावे, स्वत:च्या अधिकाराने व

कर्मचा-यांच्या उत्पनांशी विभिन्न असलेल्या उत्पनांतून केलेले व्यवहार (स्त्रीधनाद्वारे, देणग्याद्वारे, वारसाहक्काद्वारे इ.)पोट-नियम (२) आणि (३) मधील तरतुदीनुसार शासकीय कर्मचा-याच्या कुटुंबियांनी केलेले व्यवहार मानण्यात येणार नाहीत.

३. तथापि, उपरोक्त नियमांप्रमाणे छाननी करुन परिपूर्ण अहवाल प्राप्त होत नसल्याचे निर्दशनास आल्याने, व त्यासाठी शासनाचा, व प्रशासनाचा बराच वेळ व श्रम यांचा अपव्यय होतो. म्हणून मालमत्ता खरेदी / विक्री करिता परवानगीबाबत खालील सूचनांप्रमाणे काटेकोरपणे छाननी करुनच असे प्रस्ताव सादर करण्याबाबत शासनाने स्पष्टरित्या सूचीत केले आहे :-

१. स्थावर मालमत्तेच्या व्यवहाराबाबत शासनाच्या परवानगीकरिता प्रस्ताव सादर करताना महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, १९७९, मधील नियम १९ च्या उपनियम २ व ३ मधील परंतुकानुसार शासन परवानगीची आवश्यकता का आहे, हे सविस्तर नमूद करुनच शासनाकडे प्रस्ताव सादर करावेत.

२. भारतीय पोलीस सेवेतील अधिका-यांकरिता शासनास अगोदर कळविण्याकरिता (Intimation), व परवानगीची आवश्यकता (Permission) घेण्याकरिता विहित केलेला अर्जाचा नमूना राज्य पोलीस सेवेतील अधिका-यांकरिता उपयोजित करुन त्या नमुन्यातच प्रस्ताव सादर करावेत. (अर्जाचा मराठी नमुना सोबत जोडला आहे )

३. सदर सूचना शासन परवानगीकरिता सादर करण्यात आलेल्या यापुर्वीच्या प्रस्तावांनादेखील लागू आहेत.

४. शासकीय कर्मचा-यांशी कार्यालयात पत्रव्यवहार करणा-या व्यक्तीबरोबर किंवा शासन दरबारी नोंदणी नसणा-या व्यापा-यांबरोबर करण्यात येत असेल तरच अश्या व्यवहारांसाठी शासनाची पुर्व मंजुरी घेणे आवश्यक आहे.

५. उपरोक्त व्यवहार शासन दरबारी नोंदणीकृत असलेल्या नेहमीच्या किंवा प्रसिध्द व्यापा-यांमार्फत केला असेल तर परवानगीची आवश्यकता नसून सदर खरेदी व्यवहाराबाबत आवश्यक त्या कागदपत्रांसह परवानगी ऐवजी फक्त शासन दप्तरी नोंद घेण्याबाबत नमूद करण्यात यावे.

६. तरी घटक प्रमुखांना कळविण्यात येते की, राज्य पोलीस सेवेतील गट 'अ' दर्जाच्या अधिका-यांच्या मालमत्ता खरेदी / विक्रीकरिता शासनाची परवानगी प्राप्त करणे आवश्यक असेल तर वरील नमूद सूचनांचे काटेकोरपणे पालन करुनच नियमांप्रमाणे आवश्यकता असेल तरच अशा परवानगीबाबतचे प्रस्ताव तपासूनच या कार्यालयास सादर करावेत.

( सदरचे परिपत्रक www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेले आहे)

(राजेंद्र सिंह)
अपर पोलीस महासंचालक (आस्था.)
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रति,

पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई (सस्नेह)
महासंचालक, अॅन्टी करप्शन ब्युरो, म.राज्य, मुंबई. (सस्नेह)
अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे / प्रशिक्षण व खास पथकें,

म.राज्य, मुंबई / लोहमार्ग, म.राज्य, मुंबई / रा.रा.पो.बल, म.राज्य, मुंबई / वाहतूक, म.राज्य, मुंबई / कारागृह, पुणे.

अपर पोलीस महासंचालक व संचालक, पोलीस बिनतारी संदेश, म.राज्य, पुणे.

आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

सर्व पोलीस आयुक्त [लोहमार्गसह]

सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक

संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक

विशेष पोलीस महानिरीक्षक, मोटार परिवहन, म.राज्य, पुणे / रा.रा.पो.बल.,पुणे व नागपूर / ना.ह.सं., म.राज्य, मुंबई

पोलीस उपमहानिरीक्षक, गडचिरोली परिक्षेत्र, कॅम्प नागपूर.

सर्व पोलीस अधीक्षक (जिल्हे / लोहमार्ग / मोटार परिवहन / बिनतारी संदेश सह)

उप संचालक, गुन्हे अन्वेषण प्रकटीकरण विद्यालय, नाशिक.

सर्व समादेशक, राज्य राखीव पोलीस बल

**प्रत माहिती व पुढील आवश्यक त्या कार्यवाहीकरिता सस्नेह अग्रेषित :-**

आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, म.राज्य, पुणे.

सह आयुक्त, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, पुणे / ठाणे / नाशिक / औरंगाबाद / नंदुरबार / गडचिरोली / अमरावती / नागपूर.

संचालक, समाजकल्याण, म.राज्य, पुणे

विभागीय समाज कल्याण अधिकारी, मुंबई / नाशिक / औरंगाबाद / नागपूर / पुणे / अमरावती.

प्रत माहितीसाठी सस्नेह अग्रेषित :-

अपर मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, गृह विभाग,
दुसरा मजला, हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
[लक्षवेध :- श्री.कैलास गायकवाड, उप सचिव, गृह विभाग, पोल-१]

# महाराष्ट्र शासन

क्र. रापोसे ३०१६/प्र.क्र.२७३/पोल १अ
गृह विभाग, दुसरा मजला, मुख्य इमारत,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक:- २ नोव्हेंबर, २०१६ .

प्रति,

महासंचालक व पोलीस महानिरीक्षक,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

विषय:- स्थावर मालमत्ता खरेदी/ विक्रीकरिता परवानगी .

संदर्भ:- पोमसं/२अ/सदनिका विक्री-जोगदंड/८२/२०१६ दि.०५.०७.२०१६

महोदय,

महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम १९७९ मधील नियम १९ अन्वये मालमत्ता खरेदी/विक्री करिता शासनाच्या परवानगीची आवश्यकता असलेले प्रस्ताव तपासूनच मान्यतेसाठी पाठविणे आवश्यक आहे. तथापि असे होत नसल्याचे निदर्शनास आले आहे. आपल्या कार्यालयास प्राप्त झालेली निवेदने,अर्ज सरसकटपणे शासनाच्या परवानगीसाठी पाठविले जातात त्यामुळे ब-याच वेळा शासनाच्या परवानगीची आवश्यकता नसलेले प्रस्तावदेखील पाठविण्यात येतात.त्यामुळे बरेच श्रम व वेळ यांचा अपव्यय होतो.

सबब श्री. जोगदंड यांचा प्रस्ताव खालील सूचनांसह परत पाठविण्यात येत आहे.

१. स्थावर मालमत्तेच्या व्यवहारबाबत शासनाची परवानगीकरिताचे प्रस्ताव सादर करताना महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम १९७९ मधील नियम १९ च्या उपनियम २ व ३ मधील परंतुकानुसार शासन परवानगीची आवश्यकता का आहे हे सविस्तर नमूद करुनच शासनाकडे प्रस्ताव सादर करावेत.

२. भारतीय पोलीस सेवेतील अधिका-यांकरीता शासनास अगोदर कळविण्याकरिता ( Intimation ) व परवानगी ( Permission ) घेण्याकरिता विहित केलेला अर्जाचा नमूना राज्य पोलीस सेवेतील अधिका-यांकरिता उपयोजित करून त्या नमून्यातच प्रस्ताव सादर करावेत.

३.सदर सूचना शासन परवानगीकरिता सादर करण्यात आलेल्या यापुर्वीच्या प्रस्तावांनादेखील लागू आहेत.

आपला,

(स्वाक्षरी) २/११/२०१६

(प्र. मो. बलकवडे)

o/c. कक्ष अधिकारी, गृह विभाग

सहपत्र : वरील प्रमाणे

O/C
२/११/२०१६

निर्गमित
दिनांक ०३/११/१६

पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे दि. ५.०७.२०१६ व दि.३०.०९.२०१६ ची पत्रे सहपत्रांसह अनुक्रमे पृ.१-१२९ /प.वि व पृ.१३०-२५७प.वि. वर पहावीत.

२. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी उपरोक्त दि. ५.०७.२०१६ पत्रान्वये श्री. संजय जोगदंड, उप विभागीय पोलीस अधिकारी, भंडारा यांच्या सदनिका विक्रीसाठी व दि. ३०.०९.२०१६ च्या पत्रान्वये सदनिका खरेदीसाठी शासनाच्या परवानगीसाठी प्रस्ताव सादर केले आहेत.

३. सदर प्रस्तांवनुसार श्री. जोगदंड, , उप विभागीय पोलीस अधिकारी, भंडारा त्यांची अमरावती येथील सदनिका विकून त्यामध्ये स्वतःची बचत व इतर रकमांची भर घालून पुणे येथे सदनिका विकत घेणार आहेत.त्याकरिता त्यांनी अमरावती येथीळ सदनिका विक्रीसाठी व पुणे येथील सदनिका खरेदीसाठी शासनाच्या परवानगीसाठी पोलीस महासंचालक कार्यालयामार्फत महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम १९७९ मधील नियम १९ अन्वये प्रस्ताव सादर केले आहेत.

४. महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम १९७९ मधील नियम १९ त्यातील उपनियमासह सविस्तर पृ.२५१-२५/प.वि. वर पहावा.

५. नियम १९ मधील सर्व तरतुदींचे अवलोकन करता राज्य पोलीस दलातील वर्ग १ अधिका-यांना नियम १९ मधील उपनियम १ ते ४ लागू होतात. तसेच खालील बाबी निदर्शनास येतात:-

- उपनियम १ अन्वये शासकीय कर्मचा-याने प्रथम नियुक्तीनंतर व शासनाने विहित केलेल्या वेळी मत्ता व दायित्व यांचे विवरणपत्र सादर करावयाचे आहे.त्याकरिता शासनाने दि.१५.०७.१९८६ व दि.२४.११.१९८८ च्या शासन निर्णयांद्वारे सूचना दिलेल्या आहेत.
- उपनियम २ अन्वये शासकीय कर्मचा-याने विहित प्राधिकरणाला कळविल्याखेरिज स्थावर मालमत्तेबाबतचा व्यवहार करु शकत नाही.
- उपनियम ३ अन्वये शासकीय कर्मचा-याने त्याने केलेला आर्थिक व्यवहार विहित मर्यादेपेक्षा जास्त असल्यास असा प्रत्येक व्यवहार विहित प्राधिकरणाला कळविणे आवश्यक आहे.
- उपनियम २ व उपनियम ३ मधील परंतुकानुसार संबधित शासकीय कर्मचारी याच्या कार्यालयाशी कार्यालयीन व्यवहार करणा-या आणि अधिकृत व्यावसायिकाव्यतिरिक्त इतरांशी व्यवहार करावयाचा असेल तर विहित प्राधिकरणाची पुर्वमंजुरी घ्यावी लागते.
- उपनियम ४ नुसार शासनाने आदेश दिल्यानंतर मत्ता व दायित्वाचे विवरण शासकीय कर्मचारा-याने पुराव्यासहित सादर करण्याबाबत तरतुद विहित केली आहे.
- उपनियम ५ गट मध्ये क व गट ड मधील कर्मचा-यांना सदर नियमांतुन वगळण्याबाबतची कार्यपद्धती विहित केली आहे.

६. सदर नियमातील तरतुदी पाहता राज्य पोलीस दलातील वर्ग १ अधिका-यांनी दि.१५.०७.१९८६ व दि.२४.११.१९८८ च्या शासन निर्णयांचे पालन करणे आवश्यक आहे.सदर अधिका-याने अथवा त्याच्या कुटूंबियांनी प्रत्येक स्थावर मालमत्तेचा व्यवहार करण्यापुर्वी शासनास कळविणे आणि कोणताही आर्थिक व्यवहार विहित मर्यादेपेक्षा जास्त रकमेचा असल्यास शासनास कळविणे आवश्यक आहे.स्थावर मालमत्तेचा व्यवहार करणा-या अधिकृत व्यक्ती/ संस्था यांच्याशी व्यवहार करावयाचा असल्यास शासनाच्या पूर्वपरवानगीची आवश्यकता नाही.मात्र व्यवहार करण्यापूर्वी शासनास कळविणे आवश्यक आहे. संबधित शासकीय कर्मचारी याच्या कार्यालयाशी कार्यालयीन व्यवहार करणा-या आणि अधिकृत व्यावसायिकाव्यतिरिक्त इतरांशी व्यवहार करावयाचा असेल तर शासनाची पुर्वमंजुरी

घ्यावी. मत्ता व दायित्वाचे विवरणपत्र शासन आदेश देईल त्यानुसार सादर करावे. तात्पर्य संबधित शासकीय कर्मचारी याच्या कार्यालयाशी कार्यालयीन व्यवहार करणा-या आणि अधिकृत व्यावसायिकाव्यतिरिक्त इतरांशी व्यवहार करावयाचा असेल तरच शासनाच्या पूर्वपरवानगीची आवश्यकता आहे. गट १ च्या अधिका-यांची मालमत्तेविषयीची नोंद शासनस्तरावर घेण्याची सोय उपलब्ध नाही आणि शासनास अगोदर कळविण्याकरिता ( Intimation ) व परवानगी ( Permission )घेण्याकरिता अर्जाचा नमुना विहित केलेला नाही.

७. परिच्छेद ६ मधील स्पष्टीकरण पाहता पोलीस महासंचालक कार्यालयाने शासनाच्या परवानगीची आवश्यकता असलेले प्रस्ताव तपासूनच मान्यतेसाठी पाठविणे आवश्यक आहे. तथापि असे होत नसल्याचे निदर्शनास आले आहे. पोलीस महासंचालक कार्यालयास प्राप्त झालेली निवेदने,अर्ज सरसकटपणे शासनाच्या परवानगीसाठी पाठविले जातात त्यामुळे ब-याच वेळा शासनाच्या परवानगीची आवश्यकता नसलेले प्रस्तावदेखील पाठविण्यात येतात.त्यामुळे बरेच श्रम व वेळ यांचा अपव्यय होतो. भारतीय पोलीस सेवेतील अधिका-यांकरीता शासनास अगोदर कळविण्याकरिता ( Intimation ) व परवानगी ( Permission )घेण्याकरिता अर्जाचा नमुना विहित केलेला आहे.सदर नमुना राज्य पौलीस अधिका-यांना लागू करण्याबाबत अ.मु.स.(गृह) यांनी अन्य नस्तीवर सूचित केले आहे.

८. सबब श्री. जोगदंड यांचा प्रस्ताव पोलीस महासंचालक कार्यालयास खालील सूचनांसह परत करण्यात यावा.

१. स्थावर मालमत्तेच्या व्यवहारबाबत शासनाची परवानगीकरिताचे प्रस्ताव सादर करताना महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम १९७९ मधील नियम १९ च्या उपनियम २ व ३ मधील परंतुकानुसार शासन परवानगीची आवश्यकता का आहे हे सविस्तर नमूद करुनच शासनाकडे प्रस्ताव सादर करावेत.

२. भारतीय पोलीस सेवेतील अधिका-यांकरीता शासनास अगोदर कळविण्याकरिता (Intimation) व परवानगी (Permission) घेण्याकरिता विहित केलेला अर्जाचा नमूना राज्य पोलीस सेवेतील अधिका-यांकरिता उपयोजित करून त्या नमून्यातच प्रस्ताव सादर करावेत.

३.सदर सूचना शासन परवानगीकरिता सादर करण्यात आलेल्या यापुर्वीच्या प्रस्तावांनादेखील लागू आहेत.

९. पत्राचे प्रारुप पृ.१०५ /प.वि.वर ठेवले आहे . मान्यतेनंतर निर्गमित करण्यात येईल.

Balkavde
२५/१०/२०१६

क.अ.(श्री. बलकवडे)

२५/१०/१६ उ.स. (श्री. गायकवाड) २५/१०/१६

अ.मु.स.(गृह)

२६/१०

Patil 25.10.2016

6095 26/10/16

**महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) मधील नियम १९ अन्वये स्थावर / जंगम मालमत्ता संपादन / खरेदी / विक्री / करण्याबाबतची पुर्व सुचना / परवानगीसाठी करावयाच्या अर्जाचा नमुना**

| | | |
|---|---|---|
| १. | शासकीय कर्मचा-याचे पुर्ण नांव व पदनाम | |
| २. | सध्याचे मुळ वेतन व वेतन श्रेणी | |
| ३. | अर्जाचा उद्देश/ खरेदी विक्री व्यवहार परवानगी/ पुर्वसुचनेसंबंधी | |
| ४. | मालमत्ता खरेदी केली/करावयाची आहे किंवा विक्री केली/करावयाची आहे | |
| ५. | (अ ) मालमत्ता खरेदी / विक्रीची संभाव्य तारीख<br>(ब ) मालमत्ता अगोदरच खरेदी विक्री झाली असल्यास त्याची तारीख | |
| ६. | खरेदी / विक्री करावयाच्या मालमत्तेचे स्वरुप | |
| ७. | (अ) मालमत्तेचा पत्ता व ठिकाण- घर क्रमांक/ रस्ता/ ग्राम/ तालुका/ जिल्हा/ राज्य. | |
| | (ब) मालमत्तेबाबतचे वर्णन- सुपिक/ नापीक/ कोरडवाहू जमीन इ. | |
| | (क) मालमत्ता मालकी तत्वावर / भाडे तत्वावर आहे | |
| | (ड) मालमत्तेमध्ये अर्जदाराचा हिस्सा संपूर्ण किंवा अंशत:आहे त्याचे वर्णन (जर अंशत: असेल तर प्रमाण नमूद करावे) | |
| | (इ) जर व्यवहार शासकीय कर्मचा-यांच्या नांवे नसेल, तर ज्यांच्या नांवे खरेदी असेल त्यांचे नांव / भागीदारांचीं नावे/ तपशिल व त्यातील त्यांचा वाटा | |
| ८. | मालमत्तेची किंमत (देणगी स्वरुपात असेल तर बाजारभावाची किंमत) | |
| ९. | खरेदी करावयाच्या / केलेल्या मालमत्तेची किंमत उभी करण्याचे मार्ग (त्याबाबतची पुरावा दर्शविणारी कागदपत्रें) | |
| | (अ) बँकेतील वैयक्तिक बचत | |
| | (ब) इतर बचत<br>उदा.भ.नि.नि. इ. | |
| १०. | जी मालमत्ता विक्रि करावयाची आहे ती खरेदी करताना आवश्यक परवानगी / सूचना दिली / घेतली होती काय ? | |

| | | |
|---|---|---|
| ११ | (अ) ज्याच्याबरोबर व्यवहार करणार आहे त्याचे नाव व पत्ता | |
| | (ब) व्यवहार करणारी व्यक्ती अर्जदाराच्या नातेवाईक आहे का. असल्यास नाते नमूद करावे | |
| | (क) अर्जदाराचा व्यवहार करणा-याशी यापुर्वी कार्यालयीन कामाकाजानिमित्ते संबंध आला होता का ? किंवा नजीकच्या भविष्यात कार्यालयातील कामकाजा निमित्त संबंध येणार आहे काय ? | |
| | (ड)व्यवहार कसा करण्यात आलेला आहे (खाजगी संस्थेमार्फत/ जाहिरातद्वारे किंवा मित्र वा नातेवाईकांमार्फत / वैधनिक मंडळामार्फत) सविस्तर माहिती. | |
| १२ | मालमत्ता जर देणगी स्वरुपात असेल तर नियमांप्रमाणे परवानगीची आवश्यकता आहे का ? | |
| १३ | व्यवहारा संबंधितची अधिक माहिती नमूद करावयाची आहे काय ? | |

## प्रमाणपत्र

मी असे प्रमाणित करतो की, वर नमूद केलेली मालमत्ता खरेदी / विक्रीच्या परवानगी / सुचनेबाबतची माहिती ही खरी आहे.

ठिकाण :-

दिनांक :-

सही :-

पदनाम :-